

# आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाहणी करुन ग्रामस्थांशी साधला संवाद

पनवेल, ६ जून (प्रतिनिधी): निसर्ग चक्रीवादळाने जिल्ह्यात मोठी हानी झाली आहे. याचा फटका पनवेल तालुक्यालाही बसला. या पार्श्वभूमीवर भाजपचे रायगड उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (शनिवारी) वारदोली, बेलवली परिसरात, वाड्या वस्तीला भेट पान नं.३ वर...

वर्ष २७ वे | अंक २०१ वा | पृष्ठ ४ | रविवार ७ जून, २०२० | किंमत ३ रुपये

सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।।

२७

दैनिक

सर्वाधिक वाचकांच्या पसंतीचे स्थानिक वृत्तपत्र

# वादळवारा

www.vadalwara.com

आर.एन.आय.रजि. क्र.७०९५१/९९

संपादक : विजय कडू




# ऑन ड्युटी २४ तास पत्रकारांचे कार्य; कोरोनाची 'बात' लोकांपर्यंत पोहोचविण्याचे धाडसी काम!

## पनवेल बंगाली सांस्कृतिक संस्थेची पत्रकारांना मदत




पनवेल, ६ जून (प्रतिनिधी): कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरु असलेल्या लॉकडाऊनमुळे सर्वचजण आर्थिक विवंचनेचा सामना करीत आहेत...पत्रकारही याला अपवाद नाहीत... कोरोना संकटकाळात ऑनड्युटी २४ तास पत्रकारांचे काम सुरु आहे...साथीच्या काळात कोरोनाची 'बात' लोकांपर्यंत पोहोचविणे साधे काम नाही...पत्रकार जीवावर उदार होऊन हे काम करीत असल्याने पनवेल बंगाली सांस्कृतिक संस्थेच्या वतीने पत्रकारांना जीवनावश्यक वस्तूंची मदत शुक्रवारी (दि.५) देण्यात आली...पनवेलमधील पत्रकारांना ही मदत देण्यात आली आहे...

दैनिक वादळवाराचे संपादक विजय कडू यांच्या पुढाकाराने व स्टार पनवेलचे संपादक अनिल राय यांच्या सहकार्याने ही मदत देण्यात आली. पनवेल बंगाली संस्कृतिक संस्थेचे संस्थापक एस.आर.साहा, सेक्रेटरी सायबल डे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप चक्रवर्ती पान नं.३ वर...

# निकृष्ट दर्जाची उपचार पद्धती आणि टाळेबंदीमुळे कारखानदाराचा मृत्यू



## टी.आय.ए.चे अध्यक्ष सतीश शेट्टींनी माध्यमांकडे व्यक्त केली खदखद



पनवेल, ६ जून (वार्ताहर): ४० वर्षीय कारखानदाराच्या मृत्यूमुळे तळोजा औद्योगिक वसाहत अस्वस्थ आहे. वरकरणी हा मृत्यू कोरोना विषाणूमुळे झाल्याचे निष्कर्ष निघत असले तरीसुद्धा या मृत्यूला अनेक कांगोरे आहेत. निकृष्ट दर्जाची उपचार पद्धती आणि... टाळेबंदी या मृत्यूचे कारण आहे....अशी संतप्त चर्चा औद्योगिक वसाहतीत सुरु आहे... टी.आय.ए.चे अध्यक्ष सतीश शेट्टींनी याबाबत माध्यमांकडे व्यक्त केलेली खदखद बरेच काही सांगून जाते.

तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे औद्योगिक वसाहतीमधील कारखानदारांची अस्वस्थता प्रसिद्धी माध्यमांसमोर मांडली.... ते म्हणाले की... संस्थेचे आजीव सदस्यत्व असणारे एक सदस्य...कारखानदार....याचा अवघ्या ४० व्या वर्षी दुर्दैवी मृत्यू झाला आहे. कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून लागू केलेल्या टाळेबंदीमुळे या औद्योगिक वसाहतीमध्ये हलाखीची परिस्थिती निर्माण झाली आहे. सामाजिक जीवनामध्ये अत्यंत उत्साही असणारा हा कारखानदार संस्थेच्या सगळ्या कार्यक्रमात हिरीरीने सहभागी व्हायचा.... सामाजिक कार्यकर्ता या भावनेतून त्याने कारखानदारांना भेडसावत असणाऱ्या प्रश्नांवर अथक परिश्रम घेत पाठपुरावा केला होता. अवैध पार्किंग उद्ध्वस्त करणे, महावितरणकडे विद्युत पुरवठासंबंधित समस्यांचा पाठपुरावा करणे, कारखानदारांचे मुलभूत प्रश्न प्रभावीपणे पान नं.३ वर...

# खाजगी डॉक्टरचे कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह

खोपोली, ६ जून (प्रतिनिधी): खोपोली शहरातील शास्त्री नगर मधील एका अत्यावश्यक सेवेसाठी नामांकित असलेल्या खासगी हॉस्पिटलमधील ३८ वर्षीय डॉक्टरचे रिपोर्ट कोरोना पॉझिटीव्ह येताच पालिका वैद्यकीय विभागाने पुढील उपचारासाठी एमजीएम रूग्णालयात दाखल केले आहे. डॉक्टर कोरोनाबाधीत असल्याची बातमी खोपोली शहरात वाऱ्यासारखी पसरताच वैद्यकीय क्षेत्रासह खोपोलीसह खालापूर तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सदर डॉक्टरला २८ मे रोजी ताप आल्याने २९ मे पासून बाह्यरूग्ण तपासणी बंद केली होती. पान नं.३ वर...



# प्रीतम म्हात्रे यांची कार्यतत्परता विद्युत पुरवठा झाला सुरळीत

पनवेल, ६ जून (वार्ताहर): महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यतत्परतेने पनवेलमधील विद्युत पुरवठा सुरळीत झाला. पान नं.३ वर...

# घर कोसळल्याने अपंगाला १० हजाराची मदत

कर्जत, ६ जून (आनंद सकपाळ): तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत धामोते गावात राहणारे अंपग गणेश काशिनाथ डायरे यांच्या घराचे निसर्ग चक्रीवादळात पान नं.३ वर...



# चक्रीवादळामुळे सुधागडाची भयानक अवस्था

सुधागड-पाली, ६ जून (गौसखान पठाण): निसर्ग चक्रीवादळामुळे सुधागड तालुक्यातील खेडेगावांचेही मोठे नुकसान झाले. या भागातल्या घरांची कौले आणि पत्रे उडून गेले. मोठी झाडेही रस्त्यावर कोसळली. रस्ता रुंदीकरणाच्या कामात आधीच काही झाडे तोडण्यात आली. आता उरलेल्या झाडांचेही नुकसान झाले. पान नं.३ वर...





# चक्रीवादळात ५० कोटींचे नुकसान!

## नुकसानीचे पंचनामे तातडीने करा: खासदार सुनील तटकरे

मुरुड जंजिरा, ६ जून (सुधीर नाझरे): निसर्ग चक्रीवादळामुळे मुरूड तालुक्याच्या शहरी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. खासदार सुनील तटकरे यांनी मुरुड तालुक्यात नुकसानाची पाहणी करून मुरूड तहसीलदार कार्यालयात शहरातील स्थानिक कार्यकर्ते, प्रांत अधिकारी यांच्याशी चर्चा केली. तालुक्यातील झालेल्या पान नं.३ वर...

# कोरोनावर मात, तर पुन्हा कोरोना घरात



चौक, ६ जून (अर्जुन कदम): मोहपाडा परिसरातील पती, पत्नी व मुलगी कोरोनावर मात करून आज आपल्या घरी परत येत आहे. निगेटिव्ह असणारी पॉझिटिव्ह झाल्याने पुन्हा दवाखान्यात दाखल झाली.

कोरोना या संसर्गजन्य विषाणूने जगभरात थैमान घालून जीवन नकोसे केले आहे. मोहपाडा परिसरातील पती, पत्नी व त्यांची मुलगी कोरोनावर मात करून आज आपल्या घरी येत असल्याने परिसराबरोबर खालापूर तालुक्याला दिलासा देणारी घटना आहे. पान नं.३ वर...

# निसर्ग चक्रीवादळामुळे निसर्गरम्य श्रीवर्धन तालुका झाला उजाड

**प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे मदत पोहोचण्यास उशीर**

श्रीवर्धन, ६ जून (संतोष चौकर): निसर्ग चक्रीवादळाचा हॉटस्पॉट श्रीवर्धन तालुका ठरल्यामुळे सर्वात जास्त नुकसान श्रीवर्धन तालुक्यात झाले आहे. श्रीवर्धन शहरासह तालुक्यातील ९०% घरांवरील छपरे उडून गेली आहेत. तर मोठमोठ्या इमारती व आरसीसी बांधकाम असलेल्या घरांवरील पत्राशेड पूर्णपणे उडून गेल्या आहेत.

श्रीवर्धन तालुका नारळ-पोफळीच्या वाडीसाठी अतिशय प्रसिद्ध आहे, परंतु निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे नारळ सुपारीच्या संपूर्ण वाड्या झोपून गेल्या आहेत. संपूर्णपणे बहरलेल्या वाड्यांमध्ये आता केवळ २० टक्के झाडे शिल्लक आहेत. वादळाचा तडाखा एवढा जबरदस्त होता की मोठमोठे वृक्ष देखील बुंध्यातून उन्मळून पडले आहेत. वाऱ्याचा वेग ताशी दोनशे ते दोनशे वीस किलोमीटर इतका असावा असा अंदाज स्थानिक जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे. निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे निसर्गरम्य श्रीवर्धन तालुका पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. पान नं.३ वर...

# महाड तालुक्यात महावितरणाचे १ हजाराहून अधिक पोलांचे लाखोंचे नुकसान

महाड, ६ जून (राजेश भुवड): निसर्ग चक्रीवादळाचा सर्वात जास्त तडाखा श्रीवर्धन, मुरूड व अलिबाग तालुक्याला बसला असला असून या वादळाची झळ रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला बसली आहे. महाड तालुक्यातही अनेक घरांवरील छपरे उडाल्याने लाखोचे नुकसान झाले आहे. या वादळाची सर्वात जास्त झळ महावितरणाला बसली आहे.

महाड तालुक्यात सुमारे एक हजाराहून अधिक पोल पडले तर काही वाकले, अनेक ट्रान्सफार्मरमध्ये बिघाड झाला आहे. पान नं.३ वर...



# चक्रीवादळात गारमाळची शाळा जमीनदोस्त

## महत्वाच्या कागदपत्रांसह मोठ्या प्रमाणात नुकसान

खोपोली, ६ जून (खलील सुर्वे): खालापूर तालुक्याला चक्रीवादळाचा जोरदार दणका बसला... तालुक्यातील अनेक घरांचे नुकसान झाले. त्यातच गारमाळ येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा जमीनदोस्त झाली.

चावनी ग्रामपंचायत हद्दीतील गारमाळ येथे ही जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा परवा झालेल्या चक्रीवादळात पान नं.३ वर...



# मोरा येथील एसबीआयचे एटीएम बंद




उरण, ६ जून (दिनेश पवार) : उरण तालुक्यातील उरण नगरपरिषद हद्दीतील मोरा येथील एसबीआयचे एटीएम तीन दिवसांपासून बंद असल्याने येथील ग्राहकांची गैरसोय होत आहे. मशीवर नो नेटवर्क, प्लिज टेक युवर कार्ड असे येत आहे. पैसे काढण्याचा प्रयत्न केल्यास येत नाहीत. ग्राहकांचे हाल होत आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून लॉकडाऊन ठेवण्यात आले आहे. उरण येथे पैसे काढण्यासाठी ग्राहकांना स्पेशल रिक्षा करावी लागत आहे वाजवीपेक्षा जास्त पैसे मोजावे लागत असून वेळेचा अपव्यय होत आहे. सदरचे एटीएम हे एका खाजगी कंपनीकडे असल्यामुळे त्याची व्यवस्था देखभाल ही खाजगी कंपनी करीत आहे असे उरण येथील एसबीआय बँकेकडून सांगितले जात आहे.

# मुरुड तालुक्यात वादळामुळे वीज मंडळाचे दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान; सचिन येरेकर

मुरुड जंजिरा, ६ जून (सुधीर नाझरे) : मुरुड तालुक्यात झालेल्या वादळामुळे वीज मंडळाचे अतोनात नुकसान झाले असून सुमारे दोन कोटीपेक्षा अधिक नुकसान होऊन ८५० पेक्षा जास्त पोल निकामी तर काही ठिकाणी तीन ट्रान्सफार्मरसुद्धा निकामी झाले असल्यामुळे वीज पुरवठा सुरळीत होण्यास किमान १५ दिवसांचा अवधी लागेल असा विश्वास मुरुड वीज मंडळाचे उप कार्यकारी अभियंता सचिन येरेकर यांनी सांगितले.

वादळ झाल्यापासून मुरुड तालुक्याचा वीज पुरवठा खंडित झाला आहे. कर्मचारीवृंदाची जास्त कुमक मागवून येथील वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्यात यावा या मागणीसाठी मानव अधिकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष जाहिद फकजी, मुशवीर जमादार, नबील उलडे या शिष्टमंडळाने वीज मंडळाच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. यावेळी वीज मंडळाची आजची परिस्थिती विशद करताना सचिन येरेकर बोलत होते.

स्थानिक ठेकेदार व वीज मंडळाने नियुक्त केलेला ठेकेदार यांची मदत घेण्यात येत आहे विजेचे पोल उभे करणे वीज वाहिन्या सुस्थित करणे व तद्रंतर वीज पुरवठा सुरू करणार असल्याचे यावेळी येरेकर यांनी सांगितले. यावेळी उपस्थित शिष्टमंडळाने वीज कर्मचारी इतर विभागतले मागून जोडणीचे काम जलद गतीने करून लोकांना सहकार्य करा अशी मागणी केली.



# पावसाळ्यापूर्वीचे काम करीत असताना दोन कामगार भाजले



पनवेल, ६ जून (वार्ताहर) : पावसाळा तोंडावर येऊन ठेपल्याने सोसायटीच्या पावसाळ्यापूर्वीचे काम करीत असताना दोन कामगार भाजल्याची घटना शनिवारी दुपारी घडली असून यावेळी तातडीने दोन्ही कामगारांना उपचारार्थ रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जनार्दन सहनिवास जुन्या पोस्ट ऑफिस जवळ पनवेल या सोसायटीमध्ये पावसाळापूर्वीचे पत्र्यांचे आणि पाईप लावण्याचे काम गच्चीवर सुरु होते. त्याकामी शफिक हैदर राहणार वडघर आणि त्याचा सहकारी वेल्डिंगचे काम करत असताना ते मशीन जोरात फुटले आणि शफिक हैदरचे अंग पूर्णपणे भाजले. तो त्याच अवस्थेत पडला आणि त्याच्यासोबत असलेल्या मदतनीसालासुद्धा इजा झाली. तात्काळ त्या दोघांना ॲम्ब्युलन्समध्ये सोसायटीमध्ये राहणाऱ्या सभासदांनी व मंदार प्रमोद काणे, सुशांत मोहिते यांनी त्यांना पुढील उपचारार्थ कळंबोली येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या घटनेची माहिती मिळताच त्या प्रभागातील नगरसेविका रुचिता लोंढे, भरत जाधव व तेथील नागरिक आणि सोसाटीमधील सर्व सभासद देखील मदतीस धावून आले.

# माजी उपसभापती वसंत काठावलेंतर्फे आदिवासी बांधवांना किराणा सामान



रसायनी, ६ जून (वार्ताहर) : माजी उपसभापती वसंत पांडुरंग काठावले यांनी आपल्या साठाव्या वाढदिवसाचे औचित्य साधून पोयंजे पंचायत समिती विभागातील देवलोली, अरीवली, आष्टे, शिवाजीनगर, कसलखंड, भातानपाडा, भाताण, पोयंजे आदी गावांतील दिव्यांग व आदिवासी बांधवांना धान्यासह किराणा सामान वाटप करुन नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

यावेळी पोयंजे पंचायत समिती विभागातील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, विविध राजकीय पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# रिलायन्स फाऊंडेशनने घेतले जनजागृतीचे काम हाती

मुरुड जंजिरा, ६ जून (सुधीर नाझरे) : रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून येथील मासेमारी करणाऱ्या बांधवांसोबत ऑडियो कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संपर्क साधून अत्यावश्यक सूचना देण्यात आल्या.

या कार्यक्रमात सुरेश भारती (असिस्टंट कमिशनर ऑफ फिशरी, रायगड)तसेच केदार बोहरा डेप्युटी कमांडट, इंडियन कोस्ट गार्ड, मुंबई) सहभागी झाले होते. त्यांनी मासेमारी करणाऱ्या बांधवांना आपली स्वतःचा तसेच आपल्या बोटीचा बचाव कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशनचे तेजस डोंगरीकर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. तसेच निसर्ग चक्रीवादळाच्या काळात मदतीसाठी रिलायन्स फाऊंडेशनच्या १८००४१९८८०० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचा सूचना देण्यात आल्या.

# कळंबोली स्टिल मार्केट परिसरात आढळला मृतदेह



पनवेल, ६ जून (वार्ताहर) : कळंबोली स्टिल मार्केट येथील निरीमय शौचालयासमोर एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कळंबोली पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, उंची अंदाजे १६५ सेंमी, रंग निमगोरा, बांधा सडपातळ, अंगावर कपडे आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे अथवा पोलीस उपनिरीक्षक एम.बी. बच्छाव यांच्याशी संपर्क साधावा.

# महाडमध्ये नुकसानीचे पंचनामे युध्दपातळीवर

महाड, ६ जून (राजेश भुवड) : कोरोना व्हायरसच्या संकटकाळात टाळेबंदीमुळे अनेकांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला असून हळूहळू सर्व रोजगार सुरू होत असतानाच निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या घरांच्या पडझडीमुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडे पुरते मोडले आहे.

या सर्व आपत्तीतून सावरण्यासाठी त्याला शासनाच्या मदतीची गरज आहे. महाड तालुक्याचे घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे मात्र दुरध्वनी व मोबाईल सेवा पूर्णपणे कोलमडली असल्याने गावातील तलाठी, ग्रामसेवक, कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपले पंचनामे करून घ्यावेत असे आवाहन प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी केले आहे.

महाड तालुक्यात बुधवारी झालेल्या निसर्ग चक्रीवादळात १ हजार ते बाराशे घरांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज महसुल प्रशासनाकडून वर्तवण्यात आला आहे. त्याचबरोबर महावितरणाचे एक हजाराहून अधिक खांबांचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, मात्र नुकसान झालेल्या प्रत्येक आपद्ग्रस्ताने आपल्या गावातील तलाठी, ग्रामसेवक, कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधून पंचनामे करुन घ्यावेत असे आवाहन प्रांताधिकारी इनामदार यांनी केले आहे.

# सुधीर ठोंबरे यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत करुन जपली सामाजिक बांधिलकी



रसायनी, ६ जून (वार्ताहर): चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका चौक विभागातील शेतकरी बांधवांना बसल्याने चौक विभागातील सामाजिक कार्यकर्ते सुधीरशेठ ठोंबरे यांनी चौक विभागातील वीसपेक्षा जास्त शेतकऱ्यांना प्रत्येकी अडीच हजारप्रमाणे आर्थिक मदत देऊन दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, सामाजिक कार्यकर्ते सुधीरशेठ ठोंबरे, नगरसेवक संकेत भासे, तालुका कृषी अधिकारी यांनी पाहणी करून शासनाकडे अहवाल पाठविणार असल्याचे समजते. तरी सध्या या परिसरातील शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत म्हणून सुधीर ठोंबरे यांनी पुढे येऊन आर्थिक मदतीच्या रुपाने सहकार्य केले. चौक विभागातील शेतकऱ्यांवर आलेली परिस्थिती पाहता त्यांना शासनाने भरपाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुधीरशेठ ठोंबरे, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, संतोष देशमुख, जयसिंग पिंगळे, महेश देशमुख आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

# डॉ.मोहिते यांच्या पार्वती हॉस्पिटलमध्ये पोलिसांची आरोग्य तपासणी निशुल्क सुरू




खोपोली, ६ जून (प्रतिनिधी) : कोरोना महामारी संकटात अहोरात्र लढणारे दोन महत्वाचे घटक म्हणजे वैद्यकीय आणि पोलीस यंत्रणा. या दोन्ही यंत्रणांचा समन्वय खोपोलीत दिसून येत आहे. टाळेबंदी सुरु झाल्यापासून आपल्या जीवाची पर्वा करता पोलीस यंत्रणा रस्त्यावर उतरून योद्ध्याचे काम करत आहे. त्यामुळे पोलिसांच्या प्रकृतीकडे साहजिकच दुर्लक्ष होत आहे ही बाब लक्षात घेत डॉ.रणजित मोहिते यांनी पार्वती हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, नर्स टीमने खोपोली पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्य पोलिसांची आरोग्य तपासणी सुरू करीत तपासणीदरम्यान काहींना आवश्यकतेनुसार उपचारार्थ दाखल करीत वैदकीय सेवा निशुल्क देणार असल्याने डॉ.मोहिते यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

मुंबईसह पनवेल शहरात कोरोनाबाधित रूग्ण वाढत असल्याने खोपोलीतील अत्यावश्यक रूग्णांना उपचारासाठी घेत नसल्यामुळे डॉ. रणजीत मोहिते यांनी सर्व रूग्णांच्या उपचारासाठी २४ तास रूग्णालय सुरू ठेवले आहे. रूग्णालयात कामासाठी येणाऱ्या सर्व परिचारिका, स्टाफ हॉस्पिटलमध्येच राहून रूग्णांची देखभाल करीत असल्याने त्यांची राहण्याची सोय घरात केली आहे. यामुळे अनेक रूग्णांचे प्राण वाचविले आहेत. कोरोना महामारी संकटात अहोरात्र लढणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. रणजित पाटील, खोपोली ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनाजी क्षीरसागर यांच्या पुढाकाराने डॉ.मोहिते यांच्या रूग्णालयात पोलिसांची आरोग्य तपासणी सुरू केली असून दररोज टप्प्या टप्प्याने आरोग्य तपासणी केली जात आहे.

तर कोव्हीड योद्ध्यांची तपासणी करून डॉ.मोहिते यांच्या एकमेका सहाय्य करू या भूमिकेला सलाम असून या अभियानाबाबत डॉ.मोहिते यांना विचारणा केली असता त्यांनी याबद्दल जास्त बोलण्यास नकार देत अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य या हेतूने अशी सेवा करत राहू असे सांगितले.

# निसर्ग चक्रीवादळात काम करणाऱ्या सामाजिक संस्था व मित्र मंडळांचे कौतुक

खोपोली, ६ जून (प्रतिनिधी) : महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर १९ वर्षांनी धडकलेल्या चक्रीवादळाने बुधवारी रायगडला तडाखा दिला. सकाळी ११ वाजल्यापासून धडकलेल्या 'निसर्ग' कोपामुळे खोपोलीसह खालापूर तालुक्यात छोटीमोठी झाडे, विजेचे खांब पडणे, घराचे पत्रे उडून जाणे, खिडक्यांच्या काचा फुटणे आदि परिणामामुळे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान या संकट काळात खोपोलीतील सामाजिक संस्था, मित्रमंडळांच्या शिलेदारांनी आपल्या जीवांची पर्वा न करता मदतकार्य करीत रस्त्यावरील झाडे हटवित खोपोली शहर पूर्वपदावर आणण्यासाठी मेहनत घेतली त्याबद्दल नगराध्यक्षा सुमन औसरमल यांनी कौतुक, कृतज्ञता व्यक्त केली आहे.

प्रादेशिक हवामान विभाग मुंबई यांच्याकडे ३१ मे २०२० च्या पूर्वसूचनांनुसार अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून ३ जूनला दिवसा चक्रीवादळाचा मोठा तडाखा बसणार असल्याचे वेधशाळेने पूर्वसूचना दिलेली असताना खालापूर तालुक्यासह खोपोली सकाळी ११ वाजल्यापासून वादळी वारा सुरू होता. शहरातील टेकडीवरील सुभाष नगर, यशवंत नगर, मीळ ठाकूरवाडी, काजूवाडी, प्रज्ञा नगर, प्रकाश नगर लौजी आदिवासी, हाळ आदिवासी वाडी येथे आपत्कालीन यंत्रणेने भेट देत नागरिकांना सतर्क राहण्यासंबधी के.एम.सी. महाविद्यालयात, यशवंत नगर येथील रहिवाशांना सह्याद्री विद्यालय ठेवण्यात आले. तर निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे खोपोली शहरातील मोहनवाडी, प्रकाशनगर, काजुवाडी, लौजी, ताकई आदी शहरातील विविध ठिकाणच्या घरांवरील पत्रे उडले असून झाडे रस्त्यावर कोळसली असून वीजखांब वाकले होते.

नगरपालिकेचे व वीज वितरण कंपनीचे मनुष्यबळ पाहता हे सर्व सुरळीत करण्यासाठी मोठी समस्या असतानाच यशवंती हायकर्सचे पद्माकर गायकवाड, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठीचे गुरूनाथ साठीलकर, वेध सह्याद्रीचे घरडे आणि त्यांचे सर्व सहकारी, नगरसेवक किशोर पानसरे, संदीप पाटील, काय्युम पाटील, नगर परिषद कर्मचारी, अधिकारी, मुख्याधिकारी, सर्व नगरसेवक समाजसेवक, पोलीस प्रशासन, वीज वितरण कंपनीचे कर्मचारी, शिळफाटा येथील सर्व जेसीबी, क्रेन ऑपरेटर यांच्या नियोजनामुळे सर्व रस्ते वाहतूक व्यवस्था तातडीने सुरळीत केली तसेच वादळी वाऱ्यादरम्यान स्थलातंरीत केलेल्या नागरिकांना दोनवेळच्या जेवणाची व्यवस्था सहज फाऊंडेशनचे शेखर जांभळे यांनी केल्याबद्दल खोपोली नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सुमन औसरमल यांनी कौतुक व कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# नवीन वसाहत पेण कोरोना विषाणू बाधित क्षेत्र म्हणून घोषित

अलिबाग, ६ जून (जिमाका) : जिल्ह्यातील पेण तालुक्यातील नवीन वसाहत पेण येथे एक व्यक्ती करोना विषाणू बाधित आढळून आल्याने या हद्दीतील कोरोनाबाधित रुग्ण राहात असलेल्या नवीन वसाहत पेण येथील सदरचा रुग्ण राहत असलेल्या भागामधील रुग्णाचा बंगला व त्या सभोवतालचे कंपाऊंड, नवीन वसाहत, गणपती मंदिराजवळील क्षेत्र कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी पुढील २८ दिवस Containment Zone (कोरोना विषाणू बाधित क्षेत्र) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना घरातून बाहेर पडण्यास व अन्य ठिकाणी स्थलांतरीत होण्यास तसेच बाहेरून येणाऱ्या लोकांना या बाधित क्षेत्रात प्रवेश करण्यास जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड श्रीमती निधी चौधरी यांनी प्रतिबंध आदेश लागू केले आहेत.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ कलम ५१ व तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ७१, १३९ तसचे भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल, असे अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड तथा जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी कळविले आहे.

# थळ कोरोना विषाणू बाधित क्षेत्र

अलिबाग, ६ जून (जिमाका) : जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील मौजे थळ येथे एक व्यक्ती करोना विषाणू बाधित आढळून आल्याने या हद्दीतील करोना बाधित रुग्ण राहात असलेल्या मौजे थळ, ता.अलिबाग येथील सदरचा रुग्ण रहात असलेल्या भागामधील रहाते घर व त्या लगतचा कंपाऊंडमधील परिसर करोना विषाणूचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी पुढील २८ दिवस उेपींरळपाशपीं नेपश (करोना विषाणू बाधित क्षेत्र) म्हणून घोषित करण्यात आला आहे.

या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना घरातून बाहेर पडण्यास व अन्य ठिकाणी स्थलांतरित होण्यास तसेच बाहेरून येणाऱ्या लोकांना या बाधित क्षेत्रात प्रवेश करण्यास जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड श्रीमती निधी चौधरी यांनी प्रतिबंध आदेश लागू केले आहेत.

# रायगडकरांनो चला एकत्र मदत करूया! जिल्हा प्रशासनाची रायगडकरांना मदतीची हाक



अलिबाग, ६ जून (जिमाका) : जिल्ह्यात ३ जून रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे मुख्यत: दक्षिण रायगडमधील तालुक्यांमध्ये घरे, शेती, फळझाडे इत्यादींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासनाकडून या गावांमध्ये तातडीने मदतकार्य सुरु करण्यात आले आहे.

येथील नागरिकांना अधिक मदत मिळण्यासाठी जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधी, रायगड हे स्वतंत्र बँक खाते स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा अलिबाग येथे उघडण्यात आले असून त्याचा बचत खाते क्रमांक ३८२२२८७२३०० आहे.

जिल्हा प्रशासनाबरोबरच जिल्ह्यातील उद्योजक, कंपन्यांचे प्रमुख, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था या रायगडमधील नुकसान झालेल्या नागरिकांना मदत करू इच्छितात, त्या सर्व कंपन्या, संस्था आणि नागरिकांनी जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधी, रायगड या नावाने सुरु करण्यात आलेल्या बचतखात्यात सढळ हाताने मदतीची रक्कम जमा करावी असे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी केले आहे.

या बचत खात्याची माहिती पुढीलप्रमाणे - जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधी, रायगड (DISTRICT DISASTER RESPONSE FUND) AC NO.:-३८२२२८७२३०० STATE BANK OF INDIA IFSC CODE:- SBIN०००३०८

वर्ष २७ वे । रविवार ७ जून, २०२० । पृष्ठ-४

सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।।

२७

दैनिक सर्वाधिक वाचकांच्या पसंतीचे स्थानिक वृत्तपत्र

वादळवारा

संपादक : विजय कडू

# रिलायन्स टाऊनशीपमध्ये बर्निंग कारचा थरार



वाकण, ६ जून (महेश पवार) : रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या येथील कर्मचारी निवासी संकुलातील रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या स्वीफ्ट कारला अचानक लागलेल्या आगीत संपूर्ण कार जळून खाक झाली आहे. या कारला आग लागण्याची घटना शुक्रवारी (दि. ५) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. कारला आग लागली त्यावेळी तेथील आजूबाजूच्या नागरिकांना बर्निंग कारचा थरार अनुभवायास मिळाला.

रिलायन्सच्या कर्मचारी निवासी संकुलातील बी टाईप इमारतीतील कार पार्किंग शेडचे चक्रीवादळात नुकसान झाल्याने बी टाईप इमारतीत राहणारे या कारचे मालक जयंता नाईक यांनी आपली कार त्यांच्या इमारतीजवळील एका अंतर्गत रस्त्यावर शुक्रवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास उभी केली होती.

या घटनेची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात अग्नी अशी करण्यात आली असून नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# किल्ले रायगडावर शिवराज्यभिषेक सोहळा साधेपणाने साजरा

महाड, ६ जून (वार्ताहर) : हिंदवी स्वराज्य संस्थापक, युगपुरुष आणि सर्वांचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३४७ वा शिवराज्याभिषेक सोहळा आज स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडावर साधेपणाने आणि मोजक्याच शिवप्रेमींच्या उपस्थितीत, अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा महोत्सव समितीच्या वतीने साजरा करण्यात आला. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि आदल्या दिवशी निसर्ग चक्रीवादळाचा प्रकोप असतानाही लोकोत्सव बनलेल्या या पारंपरिक सोहळ्यात खंड पडला नाही. यंदा रायगडावर संभाव्य लाखो शिवप्रेमींची मांदियाळी टाळून छत्रपती शिवाजी महाराज मनामनात, शिवराज्याभिषेक घराघरात या संकल्पनेतून सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा महोत्सव समितीच्या वतीने करवीर संस्थानचे युवराज व खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले, युवराज्ञी संयोगिता राजे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी किल्ले रायगडावर ५ व ६ जून रोजी हा सोहळा साजरा करण्यात येतो. यंदा कोरोनाच्या संकटामुळे मोजक्याच शिवप्रेमींच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा करण्याचा निर्णय घेतल्याने समितीचे मोजकेच पदाधिकारी व कार्यकर्ते काल शुक्रवारी पहाटे रायगडला रवाना झाले. पण आदल्या दिवशी आलेल्या निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा संपुर्ण रायगड परिसरालाही बसल्याने या समितीचा रायगडवरुन संपर्क तुटला होता. अशाही परिस्थितीत परंपरेनुसार सायंकाळी गडावरील गडकऱ्यांच्या उपस्थितीत विधिवत गडपूजनाने शिवराज्याभिषेक सोहळ्यास सुरुवात झाली. तत्पुर्वी राजसदरेवरील मेघडंबरीतील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीसभोवती आकर्षक सजावट करण्यात आली. रात्री गडदेवता शिर्काई देवीसमोर गोंधळ घालण्यात आला. होळीच्या माळावर शिवकालीन तलवारबाजी, दांडपट्टा अशा थरारक मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांतून शिवरायांना मानवंदना देण्यात आली.





निसर्ग वादळाने मुरुड शहरात मोठी हानी झाली. खासदार सुनील तटकरे यांनी बाजारपेठेत नुकसानीची पाहणी केली. सोबत मंगेश दांडेकर, अतिक खतीब, हसमुख जैन, प्रांत शारदा पोवार आदी दिसत आहेत. (छाया : सौरभ नाझरे)



# महाडात वटपौर्णिमा साजरी

महाड, ६ जून (निलेश लोखंडे) : शहरातील काकरतळे येथे महिलांनी फिजिकल डिस्टन्स ठेऊन वटपौर्णिमा साजरी केली.

सात जन्मोजन्मी हाच नवरा मिळो... आणि आता कोरोना लवकरात लवकर जावो अशी प्रार्थना उभा मारुती मंदिराजवळील वडाला फेऱ्या मारताना महिलांनी केली.



# शिवसेनेच्यावतीने गरजूंना अन्न-धान्याचे वाटप

पनवेल, ६ जून (वार्ताहर) : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे बहुतेकांचे काम बंद असल्याने आर्थिक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मदतीचा हात म्हणून खारघर शहरामध्ये शेकडो गरजूंना अन्न-धान्याचे वाटप करण्यात आले.

सर्वांना नेहमीच मदतीचा हात देणारे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत, पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे आणि उपमहानगर प्रमुख दीपक घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर शहरामध्ये जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी उपमहानगरप्रमुख दीपक घरत, विभाग संघटक अजित घरत, उपविभागप्रमुख बंडू कोळी, शाखाप्रमुख प्रशांत जांभूळकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवसंकल्प सामाजिक संस्थेच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा



नवी मुंबई, ६ जून (विरेंद्र म्हात्रे) : नवसंकल्प सामाजिक संस्थेच्या वतीने ६ जून रोजी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा वाशी येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथील शिवस्मारकाजवळ साजरा करण्यात आला.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे फिजिकल डिस्टंसिंगचे नियम पाळत महाराजांच्या मूर्तीला पंचामृत अभिषेक करून प्रेरणामंत्र वाचन करत हा सोहळा पार पडला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सागर जगताप सभासद आदित्य घाग, राजेश गावडे, प्रियंका अनुसे, साईनाथ लांडगे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनानिमित्त रक्तदान शिबिर

कळंबोली, ६ जून (प्रतिनिधी) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन १० जून रोजी आहे. मात्र कोरोनामुळे यंदा सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करू नये. त्याऐवजी फिजिकल डिस्टन्सिंगचे सर्व नियम पाळून रक्तदान शिबिरांचे राज्यभर आयोजन करण्यात येऊन जास्तीत जास्त प्रमाणात रक्तदाते रक्तदान कसे करतील व आपल्या बांधवाना जीवनदान कसे मिळेल यासाठी प्रयत्न करण्यात यावेत असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

या आवाहनाला प्रतिसाद देत पनवेल जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष शहबाज पटेल यांनी खारघरमध्ये मी रक्तदान करणार माझ्या एका भावाला जीवनदान देणार ही संकल्पना प्रत्यक्षात राबवत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात १२५ रक्तदात्यांनी रक्तदान करुन कोरोनाविरुध्द लढ्यात सहभाग घेतला. या उपक्रमांसाठी हेमंतराजे धायगुडे पाटील ब्लड फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य व नवी मुंबई ब्लड बँकेने यांनी विशेष योगदान दिले.



या शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे यासाठी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद बागल, कार्याध्यक्ष शहबाझ पटेल, उपाध्यक्ष विलास खरटमोल, इम्रान सुभेदार, इसानुर शेख, विशाल घाडगे, तुषार मानकर, बळीराम नेटके, कृष्णा मर्ढेकर, महेश राऊत, शिवश्री अहिल्याचरित्र अभ्यासक प्राध्यापक हेमंत धायगुडे पाटील आदींनी खूप मेहनत घेतली.

# पर्यावरण दिनानिमित्त वृक्षलागवड



चौक, ६ जून(अर्जुन कदम) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पारले-जी कंपनीच्या वतीने वृक्षलागवड करण्यात आली.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पारले-जी कंपनीच्या वतीने कंपनीच्या आवारात व परिसरातील मोकळ्या जागेत आयुर्वेदिक औषधे व अन्य वृक्षांची लागवड करण्यात आली. आपल्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल करून आपल्या जीवनाला पर्यावरणपूरक बनविण्यासाठी पारले-जी कंपनीचा संकल्प असून भविष्यात येणाऱ्या महामारीच्या विरोधात लढण्याचा निश्चय केला असल्याचे व्यवस्थापनाच्या वतीने किशोर शेळके यांनी सांगितले.

# तुर्भेमध्ये जंतुनाशक फवारणी



पोलादपूर, ६ जून (प्रतिनिधी) : काही दिवसांपूर्वी पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक येथे दोन कोरोना रुग्ण आढळल्याने कोरोनाच्या ह्या परिस्थितीत तुर्भे बुद्रुक ग्रामपंचायत गाव-वाडीतील सर्वांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या हेतूने मागील दोन दिवस तुर्भे बुद्रुक गाव, शेलारवाडी, गावठाण, आदिवासीवाडी, बौद्धवाडी आणि रोहीदासवाडीमध्ये श्रीलक्ष्मीनारायण युवक मंडळाने खरेदी केलेल्या १६ लिटर क्षमतेच्या फवारणी पंपाच्या साह्याने सोडीयम हायपोक्लोराईड ९२ लिटर जंतुनाशक औषधाची फवारणी करण्यात आली. तसेच तुर्भे बुद्रुक ग्रामपंचायत परिक्षेत्रातील ग्रामस्थांची कोरोना विषाणूच्या वातावरणात प्रतिकारशक्ती वाढावी आणि त्यांना चांगले आरोग्य मिळावे म्हणून मंडळाकडून होमिओपॅथीक अर्से निक अल्बम - ३० गोळ्यांचे गावातील १९८ कुटुंबातील ८३७ सदस्यांना ३ दिवसांचे वाटप करण्यात आले.

# किल्ले रायगडावर तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक दिन



महाड, ६ जून (राजेश भुवड) : कोरोनानंतर चक्रीवादळ संकट पार करत महाराष्ट्र सरकारच्या परवानगीने ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या तिथीप्रमाणे कोकण कडा मित्र मंडळाच्या वतीने शिवराजाभिषेक दिन संपन्न झाला. मोजक्या वीस शिवभक्तांच्या उपस्थितीत व स्वागताध्यक्ष आमदार भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी रिमझिम पावसात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर अभिषेक होताना शिवभक्त आनंद व्यक्त करत होते.

प्रथम ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी ४ जून रोजी सकाळी गडदेवता शिर्काई देवीचे पूजन शहर प्रमुख नितीन पावले यांचे हस्ते झाले. त्यानंतर जगदिश्वराचा अभिषेक सोहळा संपन्न झाला. नितीन पावले, मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार यांचे हस्ते प्रतिमेवर अभिषेक करण्यात आला. त्याने सुवर्णहोनांचा अभिषेक झाल्यावर शिवभक्तांनी शिवघोषणा दिल्या.

दरम्यान दोन दिवसांचा नियोजित कार्यक्रम कोकण कडा मित्र मंडळाच्या फेसबुक पेजवरून ठिकठिकाणाहून लाईव्ह करण्यात आले होते. यात महाडहून प्रतिक कालगुडे यांचे व्याख्यान, बीडहून सुप्रसिद्ध गायक अभिजित जाधव यांचा शाहीर पथकाचे कार्यक्रम, पनवेलहून शाहीर वैभव घरत यांचा कार्यक्रम तर नागपूरहून डॉ. सुमंत टेकाडे यांचे व्याख्यान, गायक रोहीत पाटील यांचा अलिबागहून गायनाचा कार्यक्रम फेसबुकपेजवरून लाईव्ह करण्यात आला होता.

शिक्षणाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे सहनशीलता.

॥ शिका,कमवा आणि स्थायिक व्हा ॥

उरण मधील विद्यार्थी व पालकांसाठी चांगली बातमी

लीवी ओव्हरसीस मार्फत उरणमध्ये
प्रथमच हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज सुरु करत आहोत.

प्रवेश खुला २०२०/२१ पात्रता (१०वी किंवा १२वी पास व नापास व उच्च शिक्षण

१) हॉटेल मॅनेजमेंट डिप्लोमा (१ वर्ष)
६ महिने अभ्यास व ६ महिने १००%
( किचन, रूम सर्व्हिस, रिसेप्शन आणि हाऊसकीपिंग )
औद्योगिक प्रसिक्षण वेतनसोबत इंडिया
सिंगपॉर,मॉरिशस,मलयसिया,दुबई
,फ़्रान्स, जर्मनी , मालदीव मध्ये.

लवकरच सुरु करत आहोत

वसतिगृह सुविधा उपलब्ध

!! शिक्षणासोबत तुम्हाला इंग्लिश, जर्मन, फ्रेंच, भाषा शिकण्याची संधी !!

लवकरच आम्ही खालील कोर्सेस चालू करणार आहोत
१) एव्हिएशन मॅनेजमेंट
२) लॉजिस्टिक अँड सप्लाइ चेंज मॅनेजमेंट

!! माहितीसाठी आमच्याशी संपर्क साधा !!

LIVI OVERSEAS STUDY (i) PVT LTD
Foreign Education and Foreign Language Consultant

www.liviedu.com lihtm@liviedu.com

+91 8879400405, 9892320406, 9867279779

@livistudy Livioverseas Study livi_overseas_study_pvt_ltd